**मा.पंतप्रधानांनी जाहीर केलेले विदर्भ पॅकेज अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, व वर्धा या जिल्ह्यात मत्स्यतळी बांधकाम व निविष्ठासाठी केंद्र पुरस्कृत योजनेस मान्यता देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, -
शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि-२४०६/प्र.क्र.२२९ (१)/पदुम-१३ -
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२. -
दिनांकः-१९ सप्टेंबर,२००७. -

वाचा-१) केंद्र शासनाचे पत्र क्र २५-१(६)/२००६-एएचडी (कोऑर्ड), दि.३०.८.२००६ व दि.२१.९.२००६
२) आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे पत्र क्र.मत्स्य/भू/०२१९०९/६-२००७, दि.२७.७.२००७.

**प्रस्तावना**:-

गेल्या काही वर्षात विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा एक चिंतेचा विषय आहे. विदर्भातील शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त करण्यासाठी केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये विशेष पशुधन व मत्स्यव्यवसाय पॅकेज जाहिर केले आहे. केंद्र शासनाचे सदर योजना २००६-०७ ते २००८-०९ या ३ वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्यात येणार असून यासाठी एकूण ३२.९ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत विदर्भातील आत्महत्या प्रवण ६ जिल्हयांमधील शेतकऱ्यांना सहाय्य म्हणून शेततळी बांधकाम व निविष्ठावरील खर्च प्रथम वर्षासाठी देण्यात येणार असून शेततळयासाठी प्रति हेक्टर रु.२.०० लाख व निविष्ठासाठी रु.३०,०००/- च्या मर्यादेत सर्वसाधारण लाभार्थ्यांना ४० टक्के व अनुसूचित जातीजमातीच्या लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदान देय आहे. केंद्र शासनाचे हे पॅकेज राज्यात लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**:-

केंद्र शासनाने जाहीर केलेला विशेष पशुधन व मत्स्यव्यवसाय पॅकेज राज्यात राबविण्यास या शासन निर्णयास्तव मान्यता देण्यात येत आहे.

राज्यात सध्या लागू असलेल्या मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेअंतर्गत मत्स्यतळी व निविष्ठा कार्यक्रमांतर्गत सदर पॅकेज विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्यांसाठी केंद्र शासनाच्या दिनांक २१.९.२००६ च्या पत्रातील नमूद केलेल्या तरतुदीनुसार केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे विदर्भातील ६ जिल्हयात मत्स्यतळी बांधकाम व प्रथम निविष्ठांसाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. त्यानुसार शेतकऱ्यांच्या शेतामध्ये मत्स्यतळी बांधकामासाठी भांडवली खर्च प्रतिहेक्टर रु.२.०० लाख व या तळयासाठी निविष्ठा खर्च रु.३०,०००/- या मर्यादेत राहील. या प्रति हेक्टरी खर्चाच्या प्रमाणात सर्वसाधारण लाभार्थीसाठी खर्चाच्या २० टक्के ऐवजी ४० टक्के व अनुसूचित जाती/जमातीच्या शेतकऱ्यांसाठी २५ टक्के ऐवजी ५० टक्के अनुदान अनुज्ञेय राहील. या बाबींसाठी मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेअंतर्गत सध्या अनुज्ञेय असलेले अनुदान या पॅकेज अंतर्गत वरील ६ जिल्हयांसाठी वाढविण्यात आले असून ते दुप्पट करण्यात आले आहे. मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणामध्ये केंद्र व राज्याचा हिस्सा ७५:२५ असा आहे. परंतु पंतप्रधान पॅकेज अंतर्गत केंद्र शासन १०० टक्के अनुदान उपरोक्त बाबींसाठी देणार आहे. या योजनेचा आर्थिक व भौतिक प्रगतीचा अहवाल दर महिन्याला केंद्र शासनास तसेच राज्य शासनास पाठविण्यात यावा.

या योजनेवरील खर्च २४०५-मत्स्यव्यवसाय-१०१-भूजल मत्स्यव्यवसाय (०२)(०४) मत्स्यसंवर्धन विकास अभिकरण, केंद्र पुरस्कृत योजना-३१-सहाय्यक अनुदान (२४०५०८२५) केंद्र पुरस्कृत योजना या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखालील चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्र.६४/१४३२, दि.२४.७.२००७ व २१५/व्यय-१, दि. १०.९.२००७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(म. ह. सोनकुसरे),
उपसचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

प्रति, -
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती) -
प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, अमरावती, नागपूर -
विभागीय आयुक्त, अमरावती/नागूपर -

जिल्हाधिकारी, अमरावती/अकोला/बुलढाणा/वाशिम/यवतमाळ/वर्धा
मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा,
अमरावती/अकोला/बुलढाणा/वाशिम/यवतमाळ/वर्धा
जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी,
अमरावती/अकोला/बुलढाणा/वाशिम/यवतमाळ/वर्धा
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२ नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, वर्धा
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती.